## पान १ वरुन...

**लसीच्या दुष्परिणामांमुळे कोणाचा मृत्यू झाल्यास किंवा कोणतेही दुष्परीणाम झाल्यास लस पूर्णतः सुरक्षीत आहे अशी खोटी जाहीरात करुन लस घेण्यास प्रोत्साहन देणारे किंवा लस घेण्यास सक्ती करणाऱ्या सर्व सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध फसवणूक, हत्या, हत्येचा प्रयत्न (मर्डर) व इतर गुन्हे दाखल होवू शकतात**

कोणतेही अभियान चालविणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कर्मचाऱ्यांची आहे.

लस घेतल्यानंतर कोरोना रोगापासून कोणतेही खात्रीलायक संरक्षण नाही. दोन्ही डोस घेतलेल्यांना कोरोना होवू शकतो व तो व्यक्ती कोरोनाने मरु शकतो. तसेच लसीचे दोन डोज घेतलेला व्यक्ती कोरोनाचा प्रसार दुसऱ्यांना करु शकतो. त्याच्यापासून दुसरी लोक सुरक्षीत नाहीत. त्याबाबत भारत सरकारचे रेकॉर्ड व त्याआधारे दिलेले उच्च न्यायालयाचे आदेश आदी पुरावे उपलब्ध आहेत. मुंबईतील के. ई. एम. मेडीकल कॉलेज च्या विद्यार्थ्यांमध्ये २९ कोरोना रुग्णांपैकी २७ रुग्णांनी लसींचे दोन डोज घेतले होते. म्हणजेच लस घेतलेल्या **'९३टक्के'** लोकांना कोरोनाचा संसर्ग होण्याचा धोका आहे. नागपूर येथे कोरोनाची बाधा झालेल्या १३ रुग्णांपैकी लसींचे दोन्ही डोज घेणारे १२ लोक होते. म्हणजेच लस घेणाऱ्यांना संसर्गाची भीती ही सर्वात जास्त (९२ टक्के) आहे.

बेंगलोर येथे इस्पीतळात येणाऱ्या नवीन कोरोना रुग्णांमध्ये लस घेतलेल्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. नॅशनल टेक्निकल अँडव्हायझरी ग्रुप ऑफ इम्युनायझेशन (NTIAGI) चे पूर्व सदस्य श्री. जॅकोब पुलियल यांनी सर्वोच्च न्यायालयात *W.P. No. 607 of 2021* मध्ये दि. रोजी दाखल शपथपत्रा सोबत स्पष्ट पुरावे दिले आहेत की लस घेणाऱ्या लोकांमध्ये कोरोनाचा संसर्ग वाढण्याचे व मृत्यूचे प्रमाण अधिक आहे.

केन्द्र शासनाचा आरोग्य मंत्रालयाने दि. *20.09.2021* रोजी दिलेल्या उत्तरामध्ये स्पष्ट केले आहे की लस घेतल्यामुळे काय फायदा होतो याचा कोणताही निष्कर्ष अजून काढण्यात आलेला नाही. याशिवाय ठाणे महापालिका कार्यालयाने दि. **'२५.१०.२०२१'** रोजी प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते **'कमलाकर शिनॉय'** यांना लेखी माहिती दिली आहे की मरणाऱ्या रुग्णांचे कोरोना लसीकरणांबाबत कोणतीही माहिती नोंद करण्यात आलेलीच नाही. लसीचे दुष्परिणाम लोकांना न सांगता कोरोना लस पूर्णपणे सुरक्षित असल्याचा खोटा दावा करून लोकांना कोरोना लस घेण्यास प्रवृत्त करणे हा फौजदारी गुन्हा आहे. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार लसीकरण पूर्णपणे ऐच्छिक आहे आणि लस न घेतल्याने रेल्वे प्रवास, रेशनवरील धान्य, कर्मचाऱ्यांचे पगार, घटनादत्त हक्क किंवा इतर कोणतेही सरकारी अधिकार कमी करता येणार नाही.

लसीचे दोष लपवून खोटी माहिती प्रकाशीत करणाऱ्या आरोपीविरुद्ध **'अव्हेकन इंडिया मूव्हमेंट'** तर्फे सी.बी.आय. कडे तक्रार करण्यात आली आहे. लसीकरणावर कोणतेही बंधन नसल्याने लसीच्या प्रतिकुल परिणामासाठी कोणतीही भरपाई देण्याची तरतूद नसल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे लसीकरण बंधनकारक करणारे मंत्री, अधिकारी व डॉक्टर्स नुकसानभरपाई देण्यास जबाबदार आहेत. लस पूर्णपणे सुरक्षित असल्याचा खोटा प्रचार करून लोकांना लस घेण्यास भाग पाडणे हा फौजदारी गुन्हा आहे. जर लस घेणारी व्यक्ती त्याच्या दुष्परिणामामुळे मरण पावली, तर सर्व अधिकारी, डॉक्टर, मंत्री आदींना फाशी किंवा जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते.

केन्द्र सरकारने स्पष्ट केले आहे की लस घेण्यास कोणतेही बंधन घातले नसल्यामुळे लसीच्या दुष्परीणामांसाठी कोणतीही नुकसान भरपाईची तरतूद ठेवलेली नाही. यावरून असे स्पष्ट होते की, जे अधिकारी लस घेण्यास दबाव आणतील ते सर्व अधिकारी पिडीत व्यक्तीस नुकसान भरपाई देण्यास स्वतः जबाबदार राहतील.

नुकतेच एका २३ वर्षीय युवकाने लस घेतल्याच्या तीन तासाच्या आत त्याचा मृत्यू लसीचा दुष्परिणामांमुळे झाल्यामुळे मृत युवकाच्या आईने लस सुरक्षित असल्याचा खोटा प्रचार करणारे डॉ. रणदीप गुलेरिया, डॉ. व्ही. जी सोमाणी त्यांच्यासह लस घेण्यासाठी दबाव आणण्यासाठी रेल्वे पाससाठी लस घेणे बंधनकारक असल्याचा बेकायदेशीर नियम बनविणारे महाराष्ट्राचे मुख्य सचिव सीताराम कुंटे, महापालिका आयुक्त इकबाल चहल, सुरेश काकाणी, लस निर्माता कंपनीचे अदर पूनावाला आदींविरोधात कट रचून फसवणूक, हत्या शासकीय मालमत्तेचा दुरुपयोग लस कंपन्यांच्या फायद्यासाठी करणे आदी गुन्ह्यासाठी भादंवि *५२, ११५, ३०२, ४२०, ४०९, १२०(B), १०९, ३४* व आपत्ती व्यवस्थापन कायदा चे कलम *51(b), 55* आदी कलमांतर्गत कारवाई साठी केस दाखल केली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन चे पूर्व अध्यक्ष ***के.के. अग्रवाल*** व दिल्लीतील ६० डॉक्टर्स ज्यांनी कोरोना लसीचे दोन्ही डोस घेतले होते त्यांचा मृत्यू कोरोनानेच झाला होता.

जनतेच्या पैशावर सर्व सुविधा घेवून नागरिकांचे व देशाचे हित न जोपासता पदाचा दुरुपयोग करून लस कंपन्यांच्या गैरफायद्यासाठी पदाचा दुरुपयोग करणाऱ्या अश्या अधिकारी व मंत्र्यांना भादंवि. ४०९ मध्ये जन्मठेपेची म्हणजेच आजन्म कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे. सदरचा कोरोना लस कंपन्यांना फायदा पोहचविण्यासाठी आदेश व निर्बंध काढण्याचा भ्रष्टाचार हा दरवर्षी लाख कोटींच्या पेक्षा जास्त आहे. अश्या भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट कायदा ठरवून दिला आहे. *[Noida Vs. Noida (2011) 6 SCC 527, Vijay Shekhar Vs. Union of India (2004) 4 SCC 666].*

त्याच कायद्याच्या आधारे महाराष्ट्राचे भ्रष्टाचारी गृहमंत्री अनिल देशमुखांविरुद्ध गुन्हे दाखल होऊन मंत्रालयातील दोन वरीष्ठ अधिकाऱ्यांना सी.बी.आय, इ.डी यांनी अटक केली आहे. अनिल देशमुख यांना अटक झाली असून परमबीर सिंग हे सध्या फरार आहेत. *[Param Bir Singh Vs. State of Maharashtra 2021 SCC OnLine Bom 516]*

## तृतीयपंथीयांना ओळखपत्राचे वितरण

**प्रतिनिधी / ०९ नोव्हेंबर**

**बुलडाणा :** सामाजिक न्याय विभागाच्या वतीने तृतीयपंथीय बांधवांना मिळणाऱ्या विविध शासनाच्या योजनांचे लाभासाठी ओळखपत्र देण्यात येते. त्यानुसार सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात तृतीयपंथीय बांधवांना ओळखपत्राचे वितरण पालकमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी एस. रामामूर्ती, जिल्हा पोलिस अधीक्षक अरविंद चावरीया, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी भाग्यश्री विसपुते, अपर जिल्हाधिकारी धनजंय गोगटे व्यासपीठावर उपस्थित होते.

## अभय अमृतकर शिवसेनेचे निवासी उपजिल्हाप्रमुख नियुक्त



**साहसिक वृत्त / ०९ नोव्हेंबर**

**वर्धा :** जिल्हा कार्यालयात पार पडलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत अभय अमृतकर यांची निवासी उपजिल्हा प्रमुख पदावर जिल्हाप्रमुख अनिल देवतारे यांनी नियुक्ती जाहीर केली.

संपर्कप्रमुख अनंत गुढे यांचे आदेशाने आगामी होऊ घातलेल्या नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकाच्या अनुषंगाने दि.९ नोव्हेंबर रोजी जिल्हाप्रमुख अनिल देवतारे यांचे अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत अभय अमृतकर यांना पत्र देऊन नियुक्तीची घोषणा करण्यात आली. अभय अमृतकर हे जेष्ठ शिवसैनिक असून यापूर्वी त्यांनी शहर प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली आहे.

नियुक्ती वेळेस तालुका प्रमुख गणेश इखार, शहर प्रमुख उज्वल काशीकर,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख दिलीप भुजाडे, पत्रकार विश्वभूषण तिवारी, सामाजिक कार्यकर्ते, मंगेश धोंगडे, सामाजिक कार्यकर्ते आसिफ शेख, मनिष भुजाडे,पराग कुकडे, डब्बू सरदार यांची उपस्थिती होती.

## सिंदी मेघेच्या सरपंच प्रिती किर्तीध्वज सवाई यांना ग्रामस्थांची पसंती



**साहसिक वृत्त / ०९ नोव्हेंबर**

**वर्धा :** वर्धा जिल्ह्यातील सिंदी (मेघे) ग्राम पंचायत च्या सरपंच सौ. प्रिती किर्तीध्वज सवाई यांना ग्रामस्थांनी पहिली पसंती दिल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. जेव्हापासून सौ. प्रिती किर्तीध्वज सवाई यांनी ग्रा.पं. सिंदी मेघे येथील सरपंच पदाचा कार्यभार सांभाळला आहे. तेव्हापासून त्यांनी भरपूर विकासात्मक कार्य केले आहे. कृतिशील सरपंच असल्याचे त्यांच्या बाबतीत बोलल्या जात आहे. अत्यंत प्रामाणिकपणे त्या आपले कार्य करतात. सरपंच असाव्या तर सौ. प्रिती किर्तीध्वज सवाई यांच्या सारख्याच असाव्या. अशा पद्धतीच्या चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरु असल्याचे दिसून येते.

त्यांनी कितीही विकासात्मक कार्य केले तरी विरोधकांना पाहावल्या जात नाही. माझा वाटेल तेवढा विरोध करा पण मी जोपर्यंत सरपंच पदी आहे, तोपर्यंत विकासात्मक कार्य करणारचं. माझे मानसिक खच्चीकरण जेवढे करणार तेवढे सामर्थ्य मला विकासात्मक कार्य करण्यास मिळणार, असे सरपंच सौ. प्रिती किर्तीध्वज सवाई यांनी म्हटले.

माझ्या सिंदी मेघे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कटीबद्ध राहणार. मी कोणाचा विरोध करीत नाही. जर मी कोणाचा विरोधच करीत राहणार तर माझ्या गावाचा विकास केव्हा करणार. माझे गाव सुखी तर मी सुखी अशा प्रकारे सौ. प्रिती किर्तीध्वज सवाई यांनी म्हटले. गावातील ग्रामस्थ सुद्धा सरपंच सौ. प्रिती किर्तीध्वज सवाई यांना प्रथमस्थानी मानतात, असे दिसून येत आहे.

## स्कूटर चोरी प्रकरणात एका विधीसंघर्षीत बालकास अटक



**साहसिक वृत्त / ०९ नोव्हेंबर**

**हिंगणघाट :** नजीकच्या लाडकी शिवारात एका शेतकऱ्याची स्कूटर चोरी गेल्याची तक्रार हिंगणघाट पोलिसांत दि.४ रोजी करण्यात आली. यासंदर्भात एका विधीसंघर्षीत बालकास अटक करण्यात आली असून हिंगणघाट पोलिसांनी त्याचे ताब्यातुन चोरी केलेली स्कूटर सुद्धा ताब्यात घेतली.

सदर शेतकरी हिंगणघाट येथील संत गोमाजी वार्ड येथील रहिवासी असून दि.०३ रोजी त्याचे लाडकी रेल्वे गेटवरील शेताचे धुऱ्यावर ठेवून शेतात गेला असता जुपिटर कंपनीची स्कूटर क्र. एमएच-३२/एएन१६९७ ची कुणी अज्ञात इसमाने चोरी केली. स्कूटर मालक संतोष किसना येनोरकर हे शेतातील काम उरकवून परत घरी जाण्यास निघाले असता दुपारी १ वाजताचे दरम्यान उघडकिस आली होती.

सदर कारवाई ठाणेदार संपत चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोहवा विवेक बंसोड़, शेखर डोंगरे, नापोशी पंकज घोडे, प्रशांत वानखेडे, पोशी उमेश बेले यांनी केली.

## अंकुश पाटमासे यांचे निधन



**साहसिक वृत्त / ०९ नोव्हेंबर**

**वर्धा :** स्थानिक त्रिमूर्ती नगर येथील अंकुश कृष्णाजी पाटमासे यांचे काल ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास अपघाताने सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात निधन झाले. ते ५६ वर्षाचे होते. त्यांच्यावर आज ९ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता स्थानिक हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा आणि १ मुलगी असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

## घरोघरी जाऊन कोरोना लसीकरण करावे



**प्रतिनिधी / ०९ नोव्हेंबर**

**खामगांव :** शहरी भागात कोरोना लसीकरणासाठी कक्ष किंवा केंद्र सुरू करून आता उपयोग होणार नाही, आरोग्य कर्मचाऱ्यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांचे सहकार्य घेऊन घरोघरी जाऊन नागरिकांनी कोरोना लसीकरण करून घ्यावे, अशा सुचना जिल्हाधिकारी एस. रामामूर्ती यांनी केल्या. त्यांनी उपरोक्त सूचना शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक देवेंद्र देशमुख यांच्या वतीने आयोजित मिशन कवच कुंडल शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित कवच कुंडल शिबिराचे उद्घाटन रविवार, ७ नोव्हेंबर रोजी करण्यात आले. सर्वप्रथम जिल्हाधिकारी एस. रामामूर्ती यांनी राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.

यावेळी डॉ. तृप्ती लड्ढ, युवक शहराध्यक्ष आकाश करपाळे, शहर संघटक मिर्झा अकरम बेग, सय्यद मोशिद, विजय कुकरेजा, अजय धनोकार, दिलीप पाटिल, अविनाश वानखडे, प्रशांत धोटे, बोरीपुरा मसशिदचे हाजिद सय्यद रमिजोदिन, शेख मोशिद, बिसमिल्ला ख, अ. अजिज, सै. तमैजोदिन, इब्राहिम खान, शेख मोहमद, अनवर सलिम, आरोग्य कर्मचारी शोभा बरगद, नजुका गवई, आशा सेविका वानखडे, लुटे, सुषमा जाधव, र्शद्धा जाधव आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी पादचाऱ्यांसह कारमधून प्रवास करणाऱ्यांना नागरिकांचे कोरोना लसीकरण करण्यात आले. यावेळी देवेंद्र देशमुख यांनी आयोजित केलेल्या कवच कुंडल शिबिरामध्ये १७१० नागरिकांचे कोरोना लसीकरण करण्यात आले.

## बरबडी येथे समाज प्रबोधन व शाखा उद्घाटन सोहळा संपन्न



**साहसिक वृत्त / ०९ नोव्हेंबर**

**वर्धा :** येथील बरबडी या गावात समाज प्रबोधन व शाखा उदघाटन सोहळा संपन्न झाला. यामध्ये बरबडी व वाकसुर शाखेतर्फे दि. ०७ नोव्हेंबर रोजी बरबडी येथील शाखा उदघाटन सोहळा भोई समाज क्रांती दल महाराष्ट्र प्रदेशाच्या सन्माननिय पाहुण्यांतर्फे येथील स्थानिक बांधवांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन भगवानजी निमसडे यांनी केले. सर्व प्रथम वाकसुर येथील शाखेच्या फलकाचे अनावरन करून, नंतर बरबडी येथील शाखेच्या फलकाचे अनावरण केल्यानंतर श्री. मच्छिंद्रनाथ महाराजांचे व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली, पाहुण्यांचे आदरातिथ्य सत्कार करण्यात आला नंतर प्रास्ताविक केले गेले. याप्रसंगी बरबडी व वाकसुर या गावातील कार्यकारिणीची निवड करण्यात आलेल्या पदाधिकारी यांचे अभिनंदन व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

त्यामध्ये जितेंद्र ईश्वर जोगे शाखा प्रमुख, अमोल बबनराव निमसडे उपशाखा प्रमुख, गजानन डोमाजी निमसडे सचिव, प्रविण सुधाकर निमसडे सहसचिव, विश्वास सुभाष निमसडे संघटक, रुपेश संतोषराव दाते कोषाध्यक्ष, सौ. निता निमसडे महीला शाखा अध्यक्ष, सौ. अर्चना सुरजुसे महीला उपशाखा प्रमुख, सौ. जयश्री सातघरे सचिव, सरला बावणे सहसचिव, सुंदराबाई निमसडे संघटक, सौ. गंगाबाई निमसडे कोषाध्यक्ष, सौ. शालुबाई सुरजुसे सदस्य.

उपस्थित मान्यवरांपैकी श्री. अमोलभाऊ बावणे, गोपाळ भाऊ, राकेश मोहीजे, सौ.छायाताई दानव, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रदेश संघठन मंत्री, राहुल हरसुले यांनी आपले मनोगत मांडतांना संघठन व संघठणेचे महत्व काय आहे यावर आपले मार्गदर्शन केले. संस्थापक अध्यक्ष प्रकाशजी लोणारे साहेब यांनी आपल्या मार्गदर्शनात सामाजिक विकास कसा साधता येईल व कोरोना नंतर आपण कशा पद्धतीने आपला व्यवसाय सावरु शकतो. तसेच मासेमारी व्यवसाय व ईतर अनेक व्यवसायांच्या माध्यमातून आपला विकास कसा साधता येईल व अनेक शासकीय योजनांचा व उपक्रम यांची माहिती दिली.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वर्धा जिल्हा कार्यकारिणी च्या पदाधिकारी तसेच बरबडी व वाकसुर येथील खालील समाज बांधवांनी सर्वस्वी जबाबदारी घेऊन सर्वोतोपरी मदत करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

## बेपत्ता तरुणीचा मृतदेह आढळला

**प्रतिनिधी / ०९ नोव्हेंबर**

**भंडारा :** लाखनी तालुक्यातील सावरी येथील बेपत्ता तरुणीचा मृतदेह विहीरी-
त ा
तरंगतांना आढळून आला. चैताली दिगांबर वंजारी (२१) रा.सावरी असे मृतक तरुणीचे नाव आहे.

सावरी येथील दिगांबर मोतीराम वंजारी यांची मुलगी चैताली दिगांबर वंजारी (२१) रा.सावरी हि ४ नोव्हेंबर रोजी कुणालाही न सांगता घरुन निघून गेली होती. वडीलांनी इकडेतिकडे शोध घेतला असता दिसून न आल्याने त्यांनी लाखनी पोलिस स्टेशन येथे बेपत्ता असल्याची तक्रार दिली होती. ७ नोव्हेंबर रोजी सखाराम भगवान वंजारी यांना शेतातील विहीरीत बेपत्ता चैतालीचा मृतदेह तरंगताना आढळून आला. तिने परिचारिका प्रशिक्षण पूर्ण केले होते. ती शहरातील एका खासगी रुग्णालयाच्या पॅथॉलॉजी लॅबमध्ये काम करीत होती. तिचे लग्न नागपूर जिल्ह्यातील खात येथील तरुणासोबत जुळले होते. मात्र गुरुवारी कुणालाही न सांगता ती घरून निघून गेली.

घटनेची नोंद लाखनी पोलिस स्टेशन येथे नोंद केल्याने मर्ग नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार भालेराव हे करीत आहे.

## बाबानगरातील जुगार अड्डयावर पोलिसांची धाड



**प्रतिनिधी / ०९ नोव्हेंबर**

**चंद्रपूर :** बाबानगरातील जुगार अड्डयावर पोलिसांनी धाड टाकून एका विधीसंघर्षबालकासह १२ आरोपींना अटक केली आहे. यावेळी एकूण ३६ लाख ५७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अप्पर पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती प्राप्त झाली असता रात्रीचे वेळी चंद्रपूर बल्लारपूर रोडच्या बाजूला बाबानगर येथे एका घरात काही लोक तासपत्यांवर पैशांची बाजी लावून हार-जीतचा खेळ खेळत आहेत, अशी माहिती मिळताच त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा चंदपूरचे पथक तयार करून बाबानगर, चंद्रपुर येथील राजेश गुप्ता नावाचा इसमाच्या घरावर धाड घातली.

सदर ठिकाणी इसम नामे गोलू ऊर्फ ईश्वर सुधाकर ठाकरे (वय २९) रा. पेठ वॉर्ड, डॉ. आंबेडकर चौक राजुरा, राजेश रामचंद्र गुप्ता (वय ४४) रा. महाकाली कॉलरी चंद्रपूर, प्रदीप दिनकर गमगमवार (वय ४१) रा. महाकाली वॉर्ड चंद्रपूर, हाफीज रेहमान खलील रेहमान (वय ५३) रा. गुरुनगर विराणी टॉकीजजवळ वणी, ता. वणी, जि. यवतमाळ, आसीफ शेख चाँद (वय ३०) रा. पारवा ता. घाटंजी जि. यवतमाळ, शेख, नांदकुमार रामराव खापने (वय २९) रा. कोलगाव ता. मारेगाव जि. यवतमाळ, गणेश रामदास सातपाडे (वय ३५), रा. वॉर्ड कं. ५ गडचांदूर, समीर सचिन संखारी (वय ५०) विवेकनगर चंद्रपूर, आकाश चंद्रप्रकाश रागीट (वय ३०) रा. वॉर्ड कं. १ लक्कडकोट ता. राजुरा, जि. चंद्रपुर, गौरव लक्ष्मण बंडीवार (वय २६) रा. वॉर्ड कं. ५ नांदाफाटा ता. कोरपना जि. चंद्रपूर, श्रीनिवास रामलू रंगेरी (वय ५०), रा. लालपेठ कॉलरी नंबर १ कापेवार वस्ती, जि. चंद्रपूर, सुरेश पुनराज वावरे (वय ५३) रा. वॉर्ड कं. ३ बाबुपेठ वॉर्ड, चंद्रपूर यांच्यासह एक विधीसंघर्ष बालकास ताब्यात घेतले.

वरील इसमांकडून नगदी १ लाख ९७ हजार २५० रुपये ११ मोबाईल, तीन चारचाकी गाड्या तीन दुचाकी गाड्या असा एकूण ३६ लाख ५७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस स्टेशन चंद्रपूर शहर येथे अपराध कं. ८५८/२०२१ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर करीत आहे.